वि.दि.दावा क्र. १०/२०१७, नि.क्र. ३५ व ८३ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ केशव पांडुरंग रघुते**

**उलट तपास प्रतिवादी तर्फे श्री सोनक वकील साहेब यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

६. २०.१२.२०२४ ते १९.१२.२०१५ या कालावधीतील माझे बॅक खाते क्र. २०१८५९१८५७६ चा खातेउतारा मला दाखवला. तो मीच दाखल केलेला आहे. तो बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १०४** देण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की करारनाम्यांच्या वेळी मी बॅँकेतुन रक्कम काढली असे दर्शविणारा पुरावा मी सादर केलेला नाही. मी डिमांड डाफट कॅन्सल करण्या संदर्भात बॅकेला पत्र दिले होते. त्या पत्राची प्रत आता मला दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १०५** देण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की दि. २५.११.२०१३,२०.१२.२०१३ आणि २६.०३.२०१४ या रोजी मी बॅकेतुन पैसे काढले असे दर्शविणारा पुरावा सादर केलेला नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की दि. २५.११.२०१३,२०.१२.२०१३ आणि २६.०३.२०१४ रोजींच्या करारनाम्या अन्वये मला कधीही वाद मिळकतीचा ताबा मिळाला नव्हता. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की दि. २०.१२.२०१४ रोजी मला ताबा मिळाला होता. हे मला सांगता येणार नाही की, दि. २०.१२.२०१४ रोजी मला ताबा मिळाला होता, असे वाद पत्रात व शपथपत्रात नमुद नाही. यावेळी साक्षीदारास वादपत्र वाचण्यास देण्यात आले. सदर वादपत्र वाचुन साक्षीदार नमुद करतात की दि. २०.१२.२०१४ रोजी मला ताबा मिळाला होता असे स्पष्टपणे त्यात नमुद नाही. त्यात तसे का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे खोटे आहे की वादपत्रात परिच्छेद क्र ९ व १३ मध्ये ताब्याबाबत खोटा मजकुर लिहीण्यात आलेला आहे. मला पुर्ण क्षेत्राचा ताबा देण्यात आलेला आहे.

८. हे मला माहित आहे की वादमिळकत ही प्रतिवादीची वडीलोपार्जीत मिळकत आहे. प्रतिवादीस दोन मुले व एक मुलगी आहे. त्यापैकी एका मुलाची सही करारनाम्यावर साक्षीदार म्हणुन घेतली होती. अशी सही दि २५.११.२०१३ रोजी च्या करारनामा नि. क्र ३६ वर आहे. घरगुती आर्थीक अडचणीस्तव शेती विक्री करण्याचा करार करीत आहे असे नि. क्र. ३६ मध्ये नमुद नाही. हे खोटे आहे की वाद पत्रात आणि शपथपत्र यातील परिच्छेद क्र. ५ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे

खोटे आहे की मी सांगतो त्याप्रमाणे प्रतिवादीने कधीही मला ०.३५ आर जमीन विक्री करण्याचा प्रस्ताव दिला नाही व तसा व्यवहार झाला नाही. हे खोटे आहे की मी स्वतःच अर्जनविस यांना सांगुन विक्रीपत्राचा मजकुर तयार करुन घेतला होता. हे खोटे आहे की प्रतिवादी मला असे कधीही म्हणाला नाही की विक्रीपत्रात रुपये १८,१०,०००/- अशी विक्री रक्कम नमुद करण्यात यावी. नि. क्र. ३९ मध्ये विक्रीपत्र किंमत रुपये १७,२४,७६०/- अशी बरोबर नमुद करण्यात आली आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की प्रतिवादीने आयकर वाचविण्यासाठी तशी रक्कम लिहीण्यास सांगितले होते. हे खोटे आहे की प्रतिवादीस मी रुपये १७,२४,७६०/- रोख दिलेत असे नि. क्र. ३९ मध्ये खोटे नमुद केले आहे. मांढळकर नावाचे अर्जनविस होते. दि. २५.१२.२०१४ रोजी मी रजीष्टी ऑफीसमध्ये खरेदी खतासाठी मी रोख रक्कम तिन लाख घेउन आलो होतो व उर्वरीत रक्कम सत्तावीस लाखाचे तिन म्हणजे आठ लाख, नउ लाख व दहा लाखाचा प्रत्येकी एक डीडी सोबत आणले होते. प्रतिवादी त्या दिवशी तेथे आलेच नाही. हे खोटे आहे की वादपत्र व शपथपत्र परिच्छेद क्र ६ मध्ये असे खोटे लिहीले आहे की मी विस लाख रुपयांचा डीडी व उर्वरीत रक्कम नगदी घेउन तयार होतो. नि. क्र. ३९ मधील विक्रीपत्राच्या मसुदयात विस लाख रुपयांच्या डीडीचा उल्लेख का केला नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही. मी जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नेहेमी करीत नाही. डिसेंबर २०१४ नंतर मी दोनदा विक्रीचा मसुदा तयार करुन रजीष्टी कार्यालयात गेलो होतो. परंतु त्याच्या तारखा मला आठवत नाहीत, परंतु त्या दोन्ही वेळी मी नवीन मसुदा तयार केला नव्हता. नि. क्र. ३९ वरील विक्रीपत्र करण्यासाठी प्रतिवादी त्या दिवशी का हाजर झाला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खोटे आहे की २०.१२.२०१४ किंवा २५.५.२०१५ रोजी विक्रीपत्र करुन देउ असे प्रतिवादीने मला केव्हाही सांगितले नव्हते.

९. हे खोटे आहे की तिन करारनाम्यांत शेतीचे चुकीचे वर्णन नमुद करण्यात आले होते म्हणुन मी स्वतःहुन दि. २०.१२.२०१४ रोजीचा विक्रीपत्र मसुदा तयार करुन घेतला. सन २०१३ मध्ये मी प्रतिवादीकडुन दोन एकर जमीन विकत घेतलेली आहे. हे खोटे आहे की त्या खरेदीखतावर प्रतिवादीच्या मुलांच्या सहया नाहीत.

१०. सर्वच करारनामे नागपुर येथे करण्यात आले होते. गउलकर यांच्याकडे ते करारनामे करण्यात आले होते. हे खोटे आहे की २५.११.२०१३ रोजी गउलकर यांच्याकडे करारनामा करण्यात आला त्यावेळी प्रतिवादी तेथे हजर नव्हते व त्यानंतरचे करारनामे गउलकर यांच्याकडे करण्यात आलेले नव्हते. हे खोटे आहे की २५.११.२०१३, २०.१२.२०१३ व २६.३.२०१४ या तिनही दिवशी मी नोटरी श्री गउलकर यांच्याकडे गेलो नव्हतो. हे खोटे आहे की प्रतिवादीने माझ्यासोबत कुठलाही करारनामा केला नव्हता, प्रतिवादीस माझ्याकडुन कुठलेही पैसे मिळालेले नाहीत, प्रतिवादेने माझ्यासोबत कुठलाही व्यवहार केलाला नाही, मी खोटा दावा दाखल केलेला आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. १६.०८.२०२५

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड